महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ १९ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २३४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### बेफाम वेगाला सरकारी लगामाची गरज

टिटवाळा येथील बल्याणी भागात आज भरधाव मालवाहू वाहनाने केलेली धडक ही केवळ अपघाती घटना नसून, ती वाहतूक शिस्तीच्या ढिसाळ अंमलबजावणीचे ज्वलंत उदाहरण आहे. अरुंद रस्ते, बाजारातील गर्दी, पादचाऱ्यांची वर्दळ आणि त्यातच अवजड वाहनांचा बिनधास्त प्रवेश—यामुळे अशा दुर्घटना अटळ ठरत आहेत. सहाहून अधिक पादचारी जखमी होणे आणि १२ वाहनांचे नुकसान होणे ही गंभीर बाब असून, सुदैवाने जीवितहानी टळली इतकेच समाधान मानावे लागेल. मद्यप्राशन करून वाहन चालविल्याचा संशय, घटनास्थळावरून चालकाने पळ काढणे आणि अवजड वाहनांची शहरातील बेफिकीर वाहतूक हे प्रश्न प्रशासनासाठी धोक्याची घंटा आहेत. वाहतूक नियम केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष रस्त्यावर कडक अंमलबजावणीची गरज आहे. विशेषतः बाजारपेठा व रहदारीच्या भागात अवजड वाहनांना वेळेची मर्यादा, वेग नियंत्रण, सीसीटीव्ही निरीक्षण आणि नियमित तपासण्या आवश्यक आहेत. या घटनेत नागरिकांनी दाखवलेली मदतभावना निश्चितच कौतुकास्पद असली, तरी अपघातानंतरची मदत नव्हे, अपघात टाळणे हेच खरे यश आहे. वाहतूक विभाग, पोलीस प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी संयुक्तपणे कठोर उपाययोजना राबविल्या नाहीत, तर अशा घटना पुन्हा पुन्हा घडत राहतील. प्रश्न एकच आहे—भरधावपणाला लगाम कधी घालणार? नागरिकांच्या दृष्टीने पाहता, हा प्रश्न केवळ एका अपघातापुरता मर्यादित राहात नाही; तो शहर नियोजन, कायदा अंमलबजावणी आणि सार्वजनिक सुरक्षितता या तिन्ही घटकांवर थेट बोट ठेवतो. अरुंद रस्त्यांवर बाजारपेठा वाढतात, वाहनांची संख्या वाढते; पण त्या तुलनेत रस्त्यांची क्षमता, वाहतूक नियमन आणि पादचारी सुरक्षेची व्यवस्था तितकीच दुर्लक्षित राहते. अपघात घडल्यावर दोष चालकावर टाकून मोकळे होणे सोपे असते; मात्र अशा घटनांना कारणीभूत ठरणाऱ्या व्यवस्थात्मक त्रुटींवर प्रामाणिक आत्मपरीक्षण होत नाही. जोपर्यंत 'अपघात झाल्यावर हालचाल' ही मानसिकता बदलून 'अपघात होऊच नयेत' अशी धोरणात्मक भूमिका घेतली जात नाही, तोपर्यंत रस्ते सुरक्षित होणार नाहीत—आणि प्रत्येक अपघात समाजाच्या सामूहिक अपयशाची साक्ष देत राहील.

# उल्हास नदी संवर्धनासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा

## आमदार किसन कथोरे यांची केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांसोबत चर्चा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
● **प्रतिनिधी / दि. १८**

**उल्हासनगर :** उल्हास नदीच्या संवर्धन व पुनरुज्जीवनासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत आमदार किसन कथोरे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीत उल्हास नदीतील वाढते प्रदूषण, सांडपाणी व्यवस्थापन, नदीपात्र स्वच्छता, जैवविविधतेचे संरक्षण तसेच विविध संबंधित विभागांमध्ये अधिक प्रभावी समन्वय साधण्याबाबत सकारात्मक संवाद झाला. उल्हास नदी स्वच्छ व प्रदूषणमुक्त करण्यासाठी केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ कोकण व ठाणे परिसराला मिळावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार कथोरे यांनी यावेळी स्पष्ट केले. या अनुषंगाने लवकरच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करून ठोस कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना केंद्रीय मंत्र्यांनी दिल्या असून, या प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे. उल्हास नदी ही कोकण व ठाणे परिसराची जीवनवाहिनी असून, तिचे संवर्धन व संरक्षण ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे आमदार कथोरे यांनी नमूद केले. नदी स्वच्छता व पर्यावरण रक्षणाच्या उपक्रमांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. या भेटीच्या वेळी भाजपा कोकण विभाग आयटी सेल संयोजक मिलिंद धारवाडकर उपस्थित होते.

# झी वसुंधरा अभियानात केडीएमसीला १.५० कोटींचे बक्षीस

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**




कल्याण : पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या माध्यमातून पृथ्वी, वायू, जल, अग्नी व आकाश या पंचतत्त्वांवर आधारित "माझी वसुंधरा अभियान ५.०" राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यात आले. सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात झालेल्या या अभियानात राज्यातील एकूण ४२२ नागरी स्वराज्य संस्था व २७,८९५ ग्रामपंचायती अशा २८,३१७ स्थानिक स्वराज्य संस्थांनी सहभाग नोंदविला. या अभियानात अमृत गट (विभाग स्तरावर) अंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल रु. १ कोटी ५० लाखांचे बक्षीस महाराष्ट्र शासनाने जाहीर केले आहे. अभियान कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामाचे डेस्कटॉप मूल्यांकन तसेच क्षेत्रीय (फिल्ड) मूल्यांकन त्रयस्थ यंत्रणांमार्फत करण्यात आले. या दोन्ही मूल्यांकनांतील एकूण गुणांच्या आधारे लोकसंख्येनिहाय १४ गटांमधील विजेत्यांची निवड शासनाच्या मान्यतेनुसार करण्यात आली. मूल्यांकनाच्या निकषांमध्ये वृक्षारोपण, सौरऊर्जेचा वापर, तलावांचे सुशोभीकरण, वायू गुणवत्ता चाचणी तसेच विविध माध्यमांतून नागरिकांमध्ये जनजागृती या बाबींचा समावेश होता.

या मानांकनामुळे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने केलेल्या प्रयत्नांना शासनस्तरावर मिळालेली ही महत्त्वाची दाद मानली जात आहे.

# आज ठाण्यात शिवसन्मान ज्योत यात्रा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रभर विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. स्वराज्य, धर्मनिष्ठा, सुशासन आणि लोककल्याण या मूल्यांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने दरवर्षी शिवजन्मोत्सव साजरा केला जातो. याच परंपरेचा भाग म्हणून ठाणे शहरात यंदाही शिव सन्मान ज्योत यात्रा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा गुरुवार, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात वाजता तलावपाळी येथील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा येथून सुरू होणार आहे. ठाणे शहरात गेल्या अनेक वर्षांपासून शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून शिवरायांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्यक्रम राबवले जातात. यंदा सकल मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसन्मान ज्योत यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा गुरूवार, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात वाजता तलावपाळी येथील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा येथून यात्रेला सुरुवात होणार आहे.

शहरातील विविध प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ही यात्रा पुन्हा तलावपाळी येथेच समाप्त होणार आहे. यामध्ये सुमारे ५०० हून अधिक शिवभक्त सहभागी होणार असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आणि विचारांची उज्ज्वल परंपरा समाजापर्यंत पोहोचवणे हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे. यात्रेदरम्यान सहभागी शिवभक्त पारंपरिक वेशभूषेत ढोल-ताशांच्या गजरात सहभागी होणार असून संपूर्ण मार्गावर शिवरायांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून जाणार आहे. ठाणेकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे

# बदलापूरमध्ये शालेय वाहनांवर कारवाई

### १३ वाहनांवर कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**बदलापूर -** शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतूक विभागाकडून नुकतीच शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची प्रादेशिक परिवहन विभागाकडून तपासणी करण्यात आली. बदलापूर आणि आसपासच्या परिसरातील वाहनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये अवैध पद्धतीने विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या १३ वाहनांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईदरम्यान अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांकडून १.३६ लाखांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

बदलापूर येथे एका शालेय विद्यार्थिनीवर शाळेच्या बसमध्ये लैंगिक अत्याचार केल्याचे प्रकरण गेल्या महिन्यात उघडकीस आले होते. यामुळे काही राजकीय पक्षांनी त्या वाहनांची तोडफोड करत शालेय वाहतूक व्यवस्थेतवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. यानंतर कोणत्याही अनधिकृत पद्धतीने शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांमधून आपल्या पाल्याला पाठवू नये, असे आवाहन पालकांना केले होते. तर सुरक्षिततेच्या उपायोजना म्हणून परिवहन विभागाकडून बदलापूर आणि आसपासच्या परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. यामध्ये अवैधरित्या विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या १३ वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ अंतर्गत कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान एकूण १.३६ लाखांचा दंड वसूल करण्यात आला.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी निश्चित करण्यात आलेल्या निकषांची अंमलबजावणी होत आहे का, याची खातरजमा करण्यासाठी नुकतीच बदलापूरसह विविध शाळांच्या परिसरात अचानक तपासण्या घेण्यात आल्या. या तपासणीत संबंधित वाहनांची सर्व वैध कागदपत्रे, शालेय वाहतूक परवाना, वाहनाची प्रवासी क्षमता व प्रत्यक्ष विद्यार्थ्यांची संख्या, चालकाकडे आवश्यक त्या श्रेणीचे वैध अनुज्ञप्तीपत्र व बॅज, महिला सहवर्तीची नियुक्ती तसेच स्कूल बस नियमावलीत नमूद केलेल्या सुरक्षिततेच्या मापदंडांची काटेकोर पडताळणी करण्यात आली

# माजी महापौर विलास पाटील यांना न्यायालयीन कोठडी

### महापौर पदाच्या मतदानासाठी बंदोबस्तात आणणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करून प्रबळ दावेदार म्हणून ओळखले जाणारे कोणार्क विकास आघाडीचे प्रमुख, माजी महापौर विलास पाटील यांना बुधवारी भिवंडी सत्र न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली.

भिवंडी महापालिकेची महापौर पदाची निवडणूक दि. २० फेब्रुवारी रोजी होणार असून, या निवडणुकीसाठी विलास पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे महापौर व उपमहापौर निवडणुकीत मोठी चुरस निर्माण झाली आहे. दरम्यान, शुक्रवार दि. १३ रोजी रात्री उशिरा ठाणे आर्थिक गुन्हे शाखेने एका आर्थिक फसवणूक प्रकरणात विलास पाटील यांना ताब्यात घेतले होते. शनिवारी सुट्टीच्या न्यायालयात त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती.

दि. १६ फेब्रुवारी रोजी महापौर पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी न्यायालयाच्या परवानगीने विलास पाटील पोलिस बंदोबस्तात महानगरपालिकेत उपस्थित राहिले होते. त्यानंतर बुधवारी त्यांना प्रत्यक्ष न्यायालयात हजर न करता ऑनलाईन पद्धतीने झालेल्या सुनावणीत न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावल्याची माहिती त्यांचे वकील ॲड. नारायण अय्यर यांनी दिली.

**पुढील सुनावणी दि. २१ फेब्रुवारी**

या प्रकरणाची पुढील सुनावणी दि. २१ फेब्रुवारी रोजी होणार असल्याचे ॲड. अय्यर यांनी सांगितले. तसेच दि. २० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महापौर पदाच्या निवडणुकीसाठी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत विलास पाटील यांना पोलिस बंदोबस्तात महानगरपालिकेत आणण्याची मुभा न्यायालयाने दिली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

भिवंडी महापौर पदासाठी शिवसेना, भाजप, काँग्रेससह सुमारे दहा नगरसेवकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असून, त्यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची ठरणार आहे.

# अखेर मिरा रोडच्या टिपू सुलतान चौकाचे नाव बदलले

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

भाईंदर : मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरा रोड येथे उभारण्यात आलेल्या टिपू सुलतान चौकाचे नाव बदलून अशफाक उल्ला खान यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भातील महासभेचा ठराव मंजूर करण्यात आला. मिरा रोड येथील नया नगर परिसरात २०१६ साली महापालिकेमार्फत टिपू सुलतान चौकाची उभारणी करण्यात आली होती. मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी या चौकाचे नाव बदलण्याची घोषणा भाजप आमदार नरेंद्र मेहता यांनी केली होती. त्यानंतर या विषयावर वाद निर्माण झाला होता. दरम्यान महिन्याभरापूर्वी झालेल्या महापालिका निवडणुकांमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर बुधवारी महापौर डिंपल मेहता यांनी पहिली महासभा आयोजित केली. यावेळी टिपू सुलतान चौकाचे नाव बदलून अशफाक उल्ला खान यांचे नाव देण्याचा प्रस्ताव भाजप नगरसेवक संजय पवार यांनी मांडला.

मात्र काँग्रेस-शिवसेनेच्या संयुक्त मिरा भाईंदर विकास आघाडी'चे गटनेते जय ठाकूर यांनी या प्रस्तावाला विरोध केला. विनाकारण चौकाचे नाव बदलण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला. तथापि, मतदान प्रक्रियेत ७७ मते मिळाल्याने भाजपने चौकाचे नामांतर बहुमताने मंजूर केले.



*ROC - DGIPR/विमाका/कोवि/शिवजयंती/913

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com
पान : ०२
ठाणे ■ गुरुवार
१९ फेब्रुवारी २०२६



# शिराविनाही देह झुंजण्या शिवरायांची स्फूर्ती हवी

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे॥**



भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला उपदेश करतात की, जेव्हा जेव्हा धर्माची ग्लानी होते आणि अधर्म बळावतो, तेव्हा सज्जनांच्या रक्षणासाठी, दुष्टांच्या विनाशासाठी व धर्मसंस्थापनेसाठी मी अवतार घेतो. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात या वचनाचा प्रत्यक्ष अनुभव आला. परकीय सत्तांनी या पुण्यभूमीवरील जनतेवर अमानुष जुलूम व अत्याचार केले. स्त्रियांची अब्रू वेशीवर टांगली जात होती, मंदिरे उद्ध्वस्त होत होती, रयतेला मरण सोपे व जगणे कठीण झाले होते. घरदार, शेतजमिनींसह जनतेचा स्वाभिमान सावकारांकडे गहाण पडला होता. समाज अंधकारात बुडाला होता. या दयनीय अवस्थेचे वर्णन संत तुकाराम महाराजांनी "बुडती हे जन, न देखवे डोळा" अशा शब्दांत केले.

अशा अराजकतेच्या काळात शिवनेरीवर 'हिंदवी स्वराज्य' स्थापनेचे जिजाऊंचे स्वप्न साकार करणाऱ्या शिवसूर्याचा उदय झाला. रयतेचा वाली अवतरला. शिवबा जन्माला आला. आपल्या अमोघ शौर्याने, अद्वितीय पराक्रमाने आणि जिद्दीने शिवबाने अशक्यप्राय गोष्टी शक्य करून दाखवल्या. मुठभर मावळ्यांच्या साथीने त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. वर्षानुवर्षे गुलामगिरीत खितपत पडलेल्या जनतेला त्यांनी आपल्या तेजोमय कर्तृत्वातून आशेचा किरण दिला आणि मध्ययुगीन भारताच्या इतिहासात नवे पर्व सुरू केले.

वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी इसवी सन १६४५ मध्ये रायरेश्वराच्या शिवालयात हिंदवी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा करून शिवरायांनी स्वराज्याची सूत्रे हाती घेतली. ध्येयपूर्तीसाठी त्यांनी अहोरात्र कष्ट घेतले. संघटनकौशल्य आणि मनुष्यबळाचा योग्य वापर हे त्यांचे मोठे सामर्थ्य होते. पुणे, मावळ व चाकण परिसर पादाक्रांत करून त्यांनी सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला, सामान्यांतील असामान्य व्यक्ती ओळखल्या आणि त्यांना कार्यासाठी एकत्र बांधले. सामान्य जनतेच्या मनात आत्मविश्वास जागवून त्यांनी स्वराज्याची मशाल पेटवली.



लेखक:
शारदासुत
सुनील म्हसकर

सर्जेराव कान्होजी जेधे, तानाजी व सूर्याजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, शिवा काशिद, येसाजी कंक, मुरारबाजी यांसारख्या निष्ठावान मावळ्यांच्या साथीने शिवरायांनी आदिलशाहा, निजामशहा, कुतुबशहा आणि औरंगजेब यांच्याशी निकराचा लढा दिला. इसवी सन १६४७ मध्ये वयाच्या सतराव्या वर्षी त्यांनी तोरणा गड जिंकून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. त्याच वर्षी कोंढाणा व पुरंदर काबीज करून पुणे प्रांतावर वर्चस्व सिद्ध केले. पुढे रायरीसह सुमारे चाळीस गड-किल्ले जिंकून कोकणात स्वराज्याचा विस्तार केला.

शिवरायांच्या धाडसाचे अनेक दाखले इतिहासात प्रसिद्ध आहेत. लाल महालात शाहिस्तेखानावर केलेला हल्ला, उंबरखिंडीत कर्तबखानाचा पराभव, सुरतेची लूट व आग्र्याहून सुटका या घटना त्यांच्या पराक्रमाची साक्ष देतात. कमी सैन्य असूनही बलाढ्य शत्रूंना पराभूत करण्याची क्षमता त्यांच्या युद्धनीतीत होती. 'गनिमी कावा' या युद्धतंत्राचा प्रभावी वापर करून त्यांनी शत्रूंना पळती भुई थोडी केली. त्यामुळेच ते या युद्धतंत्राचे पहिले विश्वगुरू मानले जातात.

शिवाजी महाराज केवळ पराक्रमी योद्धा नव्हते, तर कुशल प्रशासक होते. अष्टप्रधान मंडळाची निर्मिती, राजमुद्रा, शिवराज्याभिषेक शक, शिवराई व होन नाणी, राज्यव्यवहारकोश, पंचांग शुद्धी यांतून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. भूसेना व आरमाराची उभारणी करून त्यांनी सागरी संरक्षण भक्कम केले.

ते प्रजाहितदक्ष राजे होते. शेतकऱ्यांवर जिवापाड प्रेम करणारे, दुष्काळात महसूल माफ करणारे, स्त्रियांचा सन्मान जपणारे असे ते आदर्श शासक होते. सर्वधर्मसमभाव जोपासत त्यांनी अन्यायाविरुद्ध लढा दिला, पण कधीही धर्मद्वेष केला नाही. त्यांच्या सैन्यात मुस्लिम सरदार होते आणि त्यांच्या श्रद्धास्थानांचे संरक्षण करण्याची त्यांनी सक्त ताकीद दिली होती.

छत्रपती शिवाजी महाराज हे युगप्रवर्तक होते. शौर्य, नीती, दूरदृष्टी, मानवतावाद, नेतृत्व आणि व्यवस्थापन यांचा आदर्श त्यांनी घालून दिला. "माझ्यामुळे तुम्ही नाही, तर तुमच्यामुळे मी आहे" ही त्यांची भूमिका रयतेशी असलेले नाते स्पष्ट करते. म्हणूनच ते महाराष्ट्राचे जाणते राजे ठरले.

आजच्या काळातही शिवरायांचे विचार प्रेरणादायी आहेत. केवळ प्रतीकांपुरते मर्यादित न राहता, त्यांच्या जीवनकार्याचा आशय अंगीकारणे गरजेचे आहे. स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी त्यांच्या आदर्शांवर चालण्याची गरज आहे. शिवरायांची स्फूर्ती घेऊन एकीने, निष्ठेने आणि परिश्रमाने राष्ट्र उभारणीसाठी पुढे येऊया, हीच त्यांच्या जीवनातून मिळणारी खरी प्रेरणा आहे.

# डॉ.वाळिंबे : चौकच्या मातीशी एकरूप झालेला कर्मयोगी हरपला

हातनोली माझ गाव. चौक ही आमची बाजारपेठ. लहानपणी बाबा मला सायकलवर पुढच्या दांडीवरील छोट्या सीटवर बसून चौक बाजारात घेऊन जायचे. मी खूप खुश असायचो. परंतु चौक मधून सायकल तुपगाव रोडला वळली रे वळली की मग मी रडायला सुरुवात करायचो. कारण तेव्हा मला कळायचं की आता बाबा मला डॉ. वाळींबे काकांच्या दवाखान्यात घेऊन जाणार. कारण बालपणी तुपगाव रोडला जाण्याचा संबंध दोनच कारणांनी यायचा. एक महाशिवरात्रीच्या दिवशी तुपगावच्या जत्रेला आणि दुसरं कारण डॉ. वाळिंबे काकांच्या दवाखान्यात .त्यामुळे एरवीच्या दिवशी तुपगाव रोडला सायकल वळली की हमखास डॉक्टरांकडेच आपल्याला चालवलं असणार याची जाणीव व्हायची. इंजेक्शनची मला भीती वाटायची. कधी आईबरोबर गेलो तर सकाळच्या वेळात जायचो. त्यावेळी फोन नसल्यामुळे तिथे जाऊनच नंबर काढावा लागायचा. डॉक्टर काकांचा गुण येत असल्यामुळे दवाखान्यात खूप गर्दी असायची. घरी यायला दुपार व्हायची. संध्याकाळी जायचं असेल तर बाबांबरोबर सायकलवर जायचो. तेव्हापासून मी छोट्या छोट्या गोष्टींचं निरीक्षण करायचो. कुठल्यातरी गोष्टीचा कुठल्यातरी गोष्टीशी तर्क जुळवण्याचा प्रयत्न करायचो. ती सवय लहानपणापासूनच. त्यामुळे एक दोनदा असं झालं की मी संध्याकाळी बाबांबरोबर दवाखान्यात गेलो. डॉक्टर काकांनी इंजेक्शन दिले नाही. फक्त गोळयाच दिल्या. म्हणजे कदाचित इंजेक्शनची गरज नसेल. परंतु माझा असा समज झाला की संध्याकाळी वाळींबे काकांकडे गेलं की ते इंजेक्शन देत नाहीत. त्यामुळे मग मी सकाळी आईबरोबर जाण्यापेक्षा संध्याकाळी बाबांबरोबरच जायचं पसंत करू लागलो. कधी कधी हा अंदाज फसायचा.

शिस्तप्रिय माणसं कडक असतात. फणसासारखी असतात. मला लहानपणी त्यांची भीती वाटायची. परंतु एकदा लहानपणी माझा वक्तृत्व स्पर्धेत नंबर आला.त्यामुळे लायन्स क्लब ने दगडी शाळेमध्ये माझा सत्कार ठेवला होता. त्या कार्यक्रमाला डॉ. वाळींबे काका होते. तेव्हापासून त्यांना माझं खूप कौतुक वाटायला लागलं. मग त्यांची आणि माझी गट्टी जमली. त्यांना माझ्या वक्तृत्वातल्या यशाविषयी कायमच कौतुक वाटत राहिलं. पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेमध्ये मला व्याख्यानासाठी निमंत्रित केल्याचं पत्र आलं. ते पत्र मी डॉ. वाळींबे काकांना दाखवलं. ते पत्र काका वाचत होते. मी त्यांचा चेहरा वाचत होतो. पत्र वाचून झाल्यावर , त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्न हावभाव माझ्याशी अगोदर बोलले आणि मग नंतर ते बोलले "प्रशांत, छान .इतक्या मोठ्या व्यासपीठावर तू बोलतोयस" आपल्या ग्रामीण भागातील एका मुलाला मोठी परंपरा असलेल्या पुण्याच्या नामांकित वसंत व्याख्यानमालेत व्याख्यानासाठी निमंत्रित केलं आहे याच त्यांना भारी कौतुक वाटत होतं. त्यावेळी माझ्यावर प्रेम असणारी जी माणसं पुण्यात व्याख्यान ऐकण्यासाठी आली होती त्यामध्ये श्री व सौ. वाळींबे हे दोघेही होते. आपल्यासाठी हे दाम्पत्य त्यांच्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून पुण्याला आले हे माझ्या कायमच स्मरणात राहिलं.

चौक आणि आजूबाजूच्या परिसरातील गावांमधील माणसांचा डॉक्टरांवर प्रचंड विश्वास. डॉक्टरी पेशा त्यांनी कधी व्यवसाय म्हणून केला नाही. उपजीविकेचे साधन असलं तरी सेवाभाव त्याच्यामध्ये ओतप्रोत भरलेला होता. त्यामुळे अनावश्यक टेस्ट नाही.अनावश्यक गोळया नाही. जेवढं हवं तेवढंच तेही कमी खर्चात. आजारी पडल्यानंतर इथल्या भागातील माणसांना हा विश्वास असायचा की डॉ. वाळिंबे काकांकडे गेलो की आपण बरे होणार. आता आपण समाजामध्ये पाहतो थोडं काही झालं की लगेच आपल्याला ब्लड टेस्ट सुचविल्या जातात. त्यावेळी त्या काळात फारशा रक्त तपासण्या न करताही अनुभवाच्या, सचोटीच्या आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर डॉक्टर वाळींबे काका सर्व प्रकारच्या आजारांवर गोळया औषध द्यायचे. काहीच दिवसात आपल्याला बरं वाटायला लागायचं.

मागील काही वर्षात चौक बदललं, माणसं बदलली. पण वाळींबे काकांचा दवाखाना बदलला नाही आणि काकाही बदलले नाहीत. भक्कम आणि मजबूत उपचाराची साक्ष देत त्या दवाखान्यातील बाकडे तसेच भक्कम आहेत. बदलत्या काळानुसार अद्ययावत सुविधांनी सज्ज असलेल्या हॉस्पिटलच्या इमारती चौक आणि आजूबाजूच्या परिसरात या पुढील काळात कदाचित निर्माणही होतील. परंतु सचोटी, प्रामाणिकपणा आणि विश्वास यावर उभा असलेला मातीशी नाळ असणारा डॉक्टर वाळिंबे काकांचा दवाखाना मात्र चौक परिसरातील माणसांच्या हृदयामध्ये कायमच घर करून राहील.

व्याख्याते
प्रशांत देशमुख
मो. 9822 650 280

आता आपण पाहतो प्रत्येक प्रकारचे स्पेशालिस्ट असतात. डोळ्याला काही झालं तर आपण डोळ्याच्या स्पेशलिस्ट कडे जातो. कानाला काही झालंतर आपण कानाच्या स्पेशालिस्ट कडे जातो. मला आठवतं गणपती विसर्जन झालं होतं. त्या रात्री आईच्या कानामध्ये एक पाखरू गेलं. आईला खूप त्रास होत होता. ती खूप ओरडत होती. आम्ही खूप घाबरलो होतो. आम्ही आईला डॉक्टर वाळिंबे काकांकडे आणलं. काकांनी बॅटरी घेतली. तो कान बघितला. आईचे दोन्ही हात आम्हाला धरायला सांगितले. एक चिमटा घेतला आणि आत्मविश्वासाने अंदाजाने कानातून चिमट्याच्या साह्याने पाखरू पकडून काही क्षणातच पाखराला बाहेर काढल. आईचं ओरडणं थांबलं होतं. तिच्या वेदना थांबल्या. जणू काही घडलंच नाही इतकं ती मोकळी झाली. आम्ही निर्धास्त झालो. कानाचे स्पेशलिस्ट नसतानाही अनुभवाच्या जोरावर ते हे करायचे, त्याचे एकमेव कारण म्हणजे पेशंटचा त्यांच्यावर प्रचंड विश्वास होता. हा विश्वास त्यांनी त्यांच्या अनेक वर्षाच्या अगदी माफक फी घेऊन दिलेल्या सेवेच्या तपश्चर्येतून मिळविला होता. माझ्या भावाला निखिलेशला लहानपणी आकडी आल्यानंतर आम्ही डॉक्टर काकांकडे घेऊन गेलो होतो आणि माझ्या क्लासच्या मुलीला फिट आल्यानंतर काकांकडे घेऊन गेलो होतो. योग्य उपचार करून दोघांनाही त्यांनी बरं केलं. ते दोन्ही प्रसंग मी विसरू शकत नाही.

डॉक्टर काकांकडे गेल्यावर आपण नेलेल्या बाटलीमध्ये त्यांच्याकडील पांढऱ्या ड्रम मधून दिले जाणार अगदी कमी किमतीतील परंतु अत्यंत गुणकारी खोकल्याचं लाल गुलाबी औषध आणि त्या खिडकीतून पेपरच्या कागदाच्या पुडी मध्ये बांधून दिल्या जाणाऱ्या त्यांच्याकडील गोळया आता इथून पुढे पाहायला मिळणार नाहीत.

काही काही गोष्टी कशा राहून जातात बघा. विविध क्षेत्रातल्या चांगल्या माणसांच्या मुलाखती घ्यायच्या असं मी मनात ठरवलं होतं. डॉक्टर गिरीश गुणे सरांची मुलाखत मी घेतली होती. डॉक्टर वाळींबे काकांची मुलाखत घ्यायचं माझ्या मनात होतं. परंतु तेव्हा मी विचार केला आत्ताच वैद्यकीय क्षेत्रातील डॉ .गुणे सरांची मुलाखत झाली आहे .आपण आता दोन-तीन वेगळ्या क्षेत्रातल्या माणसांची मुलाखत घेऊ आणि मग नंतर डॉक्टर वाळींबे काकांची मुलाखत घेऊ. पण ते आता राहून गेलं. काही दिवसांपूर्वी त्यांनी दवाखाना बंद केल्याचे मला कळले. तेव्हा फोन करून मी त्यांच्यासोबत बोललो. त्याचवेळी मनात आलेली दुसरीही एक गोष्ट राहून गेली. तीही कोणती ते सांगतो... मी विचार करत होतो की एखादी व्यक्ती नोकरीला असते ती निवृत्त होते, तेव्हा तिचा निरोप समारंभ केला जातो. त्या व्यक्तीचा सत्कार होतो. अशा प्रकारच्या सत्काराचे सोहळे करणारेही समाजात अनेक असतात. परंतु डॉक्टरांनी एवढी चांगली सेवा आयुष्यभर दिली आणि ते एक प्रकारे निवृत्त झाले आहेत परंतु त्याचा कुठेही आवाज नाही. निदान कधीतरी त्यांच्या घरी जाऊन त्यांनी दिलेल्या सेवेविषयी कृतज्ञता व्यक्त करावी. आपल्यापुरता आपण तोच त्यांच्या सेवेचा निरोप समारंभ समजावा. असं मी खूप मनापासून ठरवलं होतं. परंतु आज माझी कन्या मोबाईल बघताना मला म्हणाली बाबा आज सगळ्यांनी व्हाट्सअप वर एकाच प्रकारचे स्टेटस ठेवले आहेत बघा. स्टेटस पाहिले तेव्हा कळले डॉक्टर वाळींबे काका गेले. त्यांची मुलाखत आणि कृतज्ञता व्यक्त करणे दोन्ही राहून गेले.

काही वर्षांपूर्वी चौक च्या मातीत आलेला हा डॉक्टर माणूस आपल्या सेवेने इथल्या मातीशी, माणसांशी एकरूप होऊन अत्यंत समाधानाने ,आनंदाने आणि कृतार्थतेनं आज चौक च्या मातीतच विसर्जित झाला.

# आरोग्य केंद्रांतून नागरिकाभिमुख सेवा सुविधा द्या

## - उप महापौर राहुल दामले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : नागरीकांच्या गरजा ओळखुन त्यांना आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरवाव्यात, असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिकेचे उप महापौर राहुल दामले यांनी आज केले. हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या 350व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त महापालिकेच्या डोंबिवली येथील शास्त्रीनगर सामान्य रुग्णालयात आयोजिलेल्या आरोग्य शिबीराचे उद्घाटन करतेवेळी त्यांनी हे प्रतिपादन केले. श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या सारख्या थोर पुरुषांचा त्याग, बलिदान, शौर्य पुढील पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. यासाठीच या थोर पुरुषांप्रती आपल्या संवेदना व्यक्त करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत अशा समाज उपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशा आरोग्य विषयक नागरीकांना दिल्या जाणाऱ्या सेवांसाठी लागणारे सहाय्य आम्ही नक्कीच देऊ, अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलताना दिली.



शास्त्रीनगर रुग्णालयात आयोजिलेल्या आरोग्य शिबीरास उस्फूर्त प्रतिसाद

या शिबिरांच्या माध्यमातून एकाच ठिकाणी विशेष आरोग्य सेवा पुरविली जात आहे. महापालिकेने 27 नागरी आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून, 50 आरोग्य वर्धिनी केंद्रांच्या माध्यमातून आणि 59 हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखान्यांच्या माध्यमातून नागरीकांना त्यांच्या घरानजीकच आरोग्य सेवा पुरविली आहे, अशी माहिती महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपा शुक्ला यांनी आपल्या प्रास्ताविकात दिली.

हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या 350व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त शास्त्रीनगर रुग्णालयात आज गरोदरपणातील सेवा, रक्त तपासणी, स्त्रीरोग तपासणी, कर्करोग तपासणी, असंसर्गजन्य तपासणी (बीपी, डायबेटिज), त्वचा रोग इ. आजारांसाठी विशेष आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबीराचा लाभ सकाळच्या सत्रात सुमारे 714 रुग्णांनी घेतला. या शिबीरात नागरीकांना आभा आणि आयुष्यमान कार्ड बनविण्यासाठी देखील सहाय्य करण्यात आले. यावेळी डॉ.मंगेश पाटे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपा शुक्ल, शास्त्रीनगर सामान्य रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.सादीया पिंजारी, पालिका सदस्य विश्वनाथ राणे, रमेश म्हात्रे, मंदार हळबे, शशिकांत कांबळे, महेश पाटील, ज्योती पाटील, वृषाली जोशी, महापालिकेचे इतर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच मान्यवर उपस्थित होते.

# क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या पुण्यतिथी दिनी केडीएमसीतर्फे आदरांजली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या पुण्यतिथी दिनी आज कल्याण डोंबिवली महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस महापौर हर्षाली चौधरी यांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. यावेळी उपस्थित अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, उपायुक्त वंदना गुळवे, रामदास कोकरे, महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता संदीप तांबे, शिवसेना गट नेते विश्वनाथ राणे, नगरसेवक राजाराम पावशे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, व इतर कर्मचारी वर्ग, नागरिक आणि समाज बांधवांनी देखील क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी घेतला महासभा सभागृहाचा आढावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (17)** : ठाणे महानगरपालिका ची सर्वसाधारण सभा येत्या 20 फेब्रुवारी 2026 रोजी आयोजित केली आहे. या पार्श्वभूमीवर महापौर शर्मिला रोहित पिंपळोलकर यांनी आज महासभेच्या सभागृहाची प्रत्यक्ष पाहणी करून तयारीचा आढावा घेतला.




यावेळी महापालिका सचिव मनिष जोशी, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड तसेच कार्यकारी अभियंता महेश बोराडे उपस्थित होते. महापौरांनी सभागृहातील आसनव्यवस्था, ध्वनीप्रणाली, स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था आणि इतर मूलभूत सोयीसुविधांची तपासणी केली.

ठाणे महानगरपालिकेत सर्वपक्षीय 131 नगरसेवक निवडून आले असून, याशिवाय 10 स्वीकृत सदस्य सभागृहात येणार आहे. या पार्श्वभूमीवर एकूण सदस्य संख्या लक्षात घेता सभागृहातील आसनव्यवस्थेची महापौरांनी आढावा घेतला. महापौरांनी नमूद केले.

सर्वसाधारण सभा ही लोकप्रतिनिधींसाठी महत्त्वाचे व्यासपीठ असून कामकाज निर्विघ्न आणि शिस्तबद्ध पार पडणे आवश्यक आहे. त्यामुळे तांत्रिक बाबी, ध्वनिव्यवस्था आणि प्रशासकीय तयारीत कोणतीही त्रुटी राहू नये, याची दक्षता घ्यावी. तसेच महासभेच्या कामकाजाचा प्रारंभ बदललेल्या सुचनांनुसार राष्ट्रीय गीत अर्थात वंदे मातरम् आणि राज्यगीताने, तर महासभेचा समारोप राष्ट्रगीताने होणार असून ही ध्वनीफितीवर लावण्यात यावीत असेही महापौरांनी नमूद केले. एकूणच सर्वसाधारण सभा सुरळीत व यशस्वीरीत्या पार पडावी, यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी सांगितले.

# भविष्यवेध



गुरुवार
१९ फेब्रुवारी २०२६

**मेष**
ऑफिसमधील महत्त्वाच्या कामाबाबत वरिष्ठांशी चर्चा होईल. तसेच ऑफिसच्या कामानिमित्ताने बाहेर जाण्याचा योग आहे. तुमचा कार्यभार वाढणार आहे.

**वृषभ**
कामाच्या ठिकाणी महत्त्व प्राप्त होईल. कुटुंबातील सदस्यांशी सुसंवाद घडेल. घरातील सजावटीकडे जातीने लक्ष द्याल. शिवशंकराची अखंड कृपा राहील.

**मिथुन**
जीवनसाथीसोबतचे मतभेद दूर होतील. प्रेम जीवन आनंददायी होईल. विदेशातील मित्राच्या खुशालीची माहिती मिळेल. ज्या लोकांना परदेशात जायचं आहे,

**कर्क**
तुम्हाला परदेशात जाण्याचा योग आहे. त्याशिवाय धार्मिक स्थळी जाण्याचाही योग आहे. ऑफिसमधील कामाचा व्याप वाढणार आहे. त्यामुळे चिडचिडे व्हाल.

**सिंह**
व्यावसायिकांसाठी आजचा दिवस सामान्य असेल. दुपारनंतर मानसिक स्थितीत बदल होईल. तुम्ही सकारात्मक विचार कराल. चुकीचे विचार मनात येऊ शकतात.

**कन्या**
विचारावर नियंत्रण ठेवा. तसेच आर्थिक खर्च वाढल्याने आर्थिक संकटाचा सामना करावा लागणार आहे. ऑफिसमधील व्यक्तींशी मतभेद होतील.

**तुळ**
आजारी व्यक्तीने नवीन उपचार पद्धतीचा विचार करावा. मात्र, डॉक्टरांच्या सांगण्यानुसारच कोणतंही पाऊल उचला. थोडी माहिती करूनच पुढील निर्णय

**वृश्चिक**
घ्या. गुंतवणुकीसाठी आजचा दिवस बरा दिसत नाही. सुखाचा अनुभव घ्याल. दाम्पत्यजीवनात प्रेमाची अनुभूती येईल. भागिदारीतील व्यवसायात लाभ होईल.

**धनु**
भय आणि उदासीनतेने पछाडले जाल. घरात सुखशांती लाभेल. दिनचर्या व्यस्त असेल. परिश्रम करण्यात तुमचा हात कोणीही पकडणार नाही.

**मकर**
वरिष्ठांसोबत वाद घालू नका. ऑफिसमधील टार्गेट पूर्ण करण्यात अडचणी येतील. व्यापार वाढवण्यासाठी कोणत्याही योजनेवर निर्णय घेऊ नका.

**कुंभ**
तुम्हाला धैर्याने दिवस काढावा लागेल. आरोग्य उत्तम राहिल. पण खाण्यापिण्याची आबाळ होईल. अचानक मोठा खर्चा होण्याची शक्यता आहे.

**मीन**
कामाच्या ठिकाणी परफॉर्मन्स अत्यंत स्लो होईल. वेळेवर कामावर न आल्याने अडचणीचा सामना करावा लागेल. बॉसला हलक्यात घेऊ नका.



**महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कल्याण येथील कला शिक्षक यश महाजन यांनी या वर्षी टरबूजावर ब्लेडच्या साहाय्याने महाराजांची आकर्षक कोरीव प्रतिकृती साकारली.**

# भाजपने उमेदवार बदलला !

## भिवंडी महापौर निवडणुकीला वेगळे वळण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी )** संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या भिवंडी महापालिकेच्या महापौर पदाच्या निवडणुकीला आता वेगळेच वळण मिळाले असून महापौर पदाच्या निवडणुकीच्या तोंडावर असताना भाजपने आपला उमेदवार बदलला आहे.त्यामुळे भाजपात असलेली कुरबुरी पुन्हा उघड झाली आहे. त्यामुळे भाजपचे जेष्ठ नगरसेवक महापौर पदाचे उमेदवार नारायण चौधरी हे सेक्युलर आघाडी कडे वळले असुन त्यांना बहुतांश नगरसेवकांचा पाठिंबा असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी शहराध्यक्ष रवी सावंत यांना पत्र देऊन भाजपचे जेष्ठ नगरसेवक नारायण चौधरी यांना भाजपचे महापौर पदाचा अधिकृत उमेदवार म्हणून घोषित केले होते.त्यामुळे नारायण चौधरी यांनी पक्षातील सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन भाजप पक्षाकडून महापौर पदासाठीचा आपला उमेदवारी मंगळवारी (दि.17) रोजी



अर्ज देखील दाखल केला आहे.मात्र महापौर पदाच्या निवडणुकीला आज बुधवारी वेगळेच वळण लागले असून,बुधवारी (दि.१८) रोजी भाजपचे भिवंडी शहरध्यक्ष रविकांत सावंत यांनी महापौर पदाच्या उमेदवार म्हणून स्नेहा मेहुल पाटील यांच्या नावाची घोषणा केली आहे.

त्यासंदर्भातील लेखी पत्र भाजप शहराध्यक्षांनी भाजपच्या सर्व नगरसेवकांना दिले आहे. भाजपने आता स्नेहा पाटील यांची महापौर पदाची उमेदवार म्हणून जाहीर केल्याची प्रतिक्रिया भाजप शहराध्यक्ष रविकांत सावंत यांनी दिली आहे.

या विचित्र घडामोडी नंतर भाजपने उमेदवारी घोषित केलेले नारायण चौधरी यांनी नाराजी व्यक्त केली आहे.मला भाजपने महापौर पदाचा उमेदवार जाहीर केला होता. मात्र महायुतीतील घटक पक्ष सोबत यायला तयार नव्हते.

त्यांच्याशी अनेक वेळा बैठका केल्या मात्र घटक पक्ष सोबत येत नाही.त्यातच आज भाजपने स्नेहा मेहुल पाटील यांना महापौर पदाचे उमेदवार घोषित केले.त्यामुळे मी नाराज होऊन सेक्युलर सोबत जाण्याचा निर्णय घेत असल्याची माहिती भाजपचे महापौर पदासाठी उमेदवार म्हणून अर्ज दाखल केलेले नारायण चौधरी यांनी दिली आहे. महापौर पदासाठी होत असलेल्या या घडामोडी मुळे निष्ठावंत भाजपचे नगरसेवक हे चौधरी यांच्या सोबतच असल्याचे सांगत आहेत. त्यामुळे चौधरी च महापौर होणार अशी अटकळ बांधली जात असुन समाजवादी, शिवसेना, काँग्रेस सह इतर पक्षातील नगरसेवक सुध्दा त्यांना मदत करणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

# उल्हासनगरात बेकायदेशीर बेवारस वाहनांवर धडक कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**उल्हासनगर :** उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील मुख्य रस्त्यांवर तसेच पदपथांवर बेकायदेशीररीत्या बेवारस अवस्थेत उभी असलेली दुचाकी व चारचाकी वाहने नागरिकांच्या वाहतुकीस अडथळा ठरत असल्याच्या तक्रारी सातत्याने प्राप्त होत होत्या. या पार्श्वभूमीवर अशा वाहनांविरोधात धडक कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेश महापालिका आयुक्त श्रीम. मनीषा आव्हाळे यांनी दिले आहेत.

या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी मुख्य रस्त्यांवर मोठ्या संख्येने उभी असलेली बेकायदेशीर बेवारस वाहने हटविण्यासाठी संयुक्त कारवाई करण्यात येणार आहे. या मोहिमेत शहर वाहतूक शाखा, संबंधित पोलीस स्टेशन तसेच महापालिकेचे सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ४ यांचा सहभाग असणार आहे.

महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना सूचित करण्यात येत आहे की, शहरातील कोणत्याही मुख्य रस्त्यावर किंवा पदपथावर बेकायदेशीररीत्या बेवारस वाहने उभी ठेवू नयेत. यापुढे अशा वाहनांविरोधात दररोज नियमित कारवाई करण्यात येणार असून, कारवाईदरम्यान वाहने जप्त केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सहकार्य करून शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यास मदत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

**नोटीस**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. जयमाला एकनाथ मुकादम व इतर, कु.मु.प.धा. मे. साई अनंत इन्टरप्रायजेस तर्फे श्री. विश्वनाथ गोसावी व इतर | मौजे-चिंचपाडा, कल्याण पूर्व, स.नं. २५, हि.नं. १० | ०१ | नविन इमारतीच्या गटाराचे बांधकामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत.

तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**जावक क्रमांक**
**कडोंमपा/जसंवि/मुका/९५०**
**दिनांक :- १८/०२/२०२६**

**सही/-**
**(संजय जाधव)**
**वृक्ष अधिकारी, वृक्ष प्राधिकरण विभाग,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

# 'माझी वसुंधरा अभियान 5.0' मध्ये नवी मुंबई महानगरपालिका राज्यात द्वितीय

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**नवी मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या 'माझी वसुंधरा अभियान ५.०' मध्ये नवी मुंबई महानगरपालिका हिला १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या अमृत शहरांच्या गटात राज्यस्तरावर द्वितीय क्रमांकाचे मानांकन प्राप्त झाले आहे. या बहुमानाबद्दल महापौर श्रीम. सुजाता पाटील, उपमहापौर श्री. दशरथ भगत आणि आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व नवी मुंबईकर नागरिकांचे अभिनंदन केले. पंचतत्त्वांवर आधारित पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, हरित विकास, वायू-जल व्यवस्थापन आणि नागरिक सहभाग या सर्वच बाबींमध्ये सातत्यपूर्ण व सर्वसमावेशक कामगिरी केल्याबद्दल नवी मुंबई महानगरपालिकेला हा राज्यस्तरीय गौरव मिळाला आहे. अभियान दि. १ जून २०२४ ते दि. ३१ मार्च २०२५ या कालावधीत राबविण्यात आले. राज्यातील ४२२ नागरी स्थानिक संस्था व २७,८९५ ग्रामपंचायती अशा एकूण २८,३१७ स्थानिक स्वराज्य संस्थांनी सहभाग घेतला होता. डेस्कटॉप व फिल्ड मूल्यांकनातील एकूण गुणांच्या आधारे विजेत्यांची निवड करण्यात आली. भूमी, वायू, जल, अग्नी व आकाश या पाचही थिमॅटिक क्षेत्रांत वृक्षलागवड, जैवविविधता संवर्धन, कचरा व्यवस्थापन, वायू गुणवत्ता नियंत्रण, जलसंपत्ती पुनर्भरण, अक्षय ऊर्जा वापर, तसेच जनजागृती व लोकसहभाग या क्षेत्रांत नवी मुंबई महानगरपालिकेने उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. या सन्मानामागे लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी आणि पर्यावरणप्रेमी नागरिकांचे सामूहिक योगदान असल्याचे सांगत, भविष्यातही शाश्वत विकास व पर्यावरण संरक्षणासाठी नवी मुंबई महानगरपालिका सातत्याने पुढाकार घेईल, असा विश्वास आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

# टिटवाळ्यात भरधाव मालवाहू वाहनाची 12 वाहनांना धडक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**कल्याण :** टिटवाळा येथील बल्याणी भागात अरूंद रस्त्यावर बुधवारी सकाळी भरधाव मालवाहू वाहनाने १२ वाहनांना धडक दिली. या धडकेत दुचाकी, रिक्षा, मोटारी अशा एकूण १२ वाहनांचे नुकसान झाले असून सहाहून अधिक पादचारी जखमी झाले. टिटवाळा येथील बल्याणी बाजारात नागरिकांची खरेदीसाठी, कामावर जाण्यासाठी गर्दी असते. या गर्दीच्या वेळेत १६ आसनी निळे पिंप भरलेले अवजड मालवाहू वाहन



आले, चालकाने भरधाव वाहन चालविल्याने अवजड वाहनाची इतर वाहने आणि पादचाऱ्यांना धडक बसली. त्यानंतर वाहन चालकाने तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. वाहन चालक मद्य सेवन करून वाहन चालवित असावा असा संशय आल्याने काही नागरिकांनी वाहन चालकाचा विद्या मंदिर शाळेसमोरील रस्त्यावरून पाठलाग सुरू केला होता. परंतु तो निघून गेला.

काही नागरिकांनी जखमी झालेल्या पादचाऱ्यांना, रिक्षा चालकांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी नेले. चार ते पाच रिक्षा रस्त्याच्या मध्यभागी अवजडच्या धडकेत चुराडा झालेल्या स्थितीत उभ्या होत्या. काही दुचाकी धडकेमुळे रिक्षेवर मोटारीवर जाऊन आदळल्या होत्या.

# डोंबिवलीत बनावट औषधांचा पर्दाफाश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ● प्रतिनिधी / दि. १८**

**डोंबिवली :** उच्च रक्तदाबाच्या उपचारासाठी मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या 'टेलमा एएम' या नामांकित औषधाच्या बनावट गोळ्यांची विक्री करणारे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे. मुंबई व डोंबिवली परिसरात सुरू असलेल्या या गैरप्रकारावर मनपाडा पोलीस ठाण्याने कारवाई करत दोन मोठ्या औषध वितरकांना अटक केली आहे. या कारवाईत डोंबिवली येथील श्रीराम फार्मा या औषध वितरण व्यवसायाचा मालक पंकज राधेश्याम उपाध्याय (वय ३३) याला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून सुमारे ८ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी दिली. मानपाडा पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार पोलिसांनी तपास सुरू करत ही कारवाई केली. दि. २१ जानेवारी रोजी पंकज उपाध्याय याला अटक करण्यात आली असून, तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. या प्रकरणात आणखी काही वितरक व पुरवठा साखळीतील घटकांचा सहभाग असल्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत असून, तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे. या कारवाईत सहभागी असलेल्या महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाने केलेल्या तपासात धक्कादायक बाब समोर आली आहे. या बनावट गोळ्या शरीरात वेळेत विरघळत नसल्याने औषधाचा अपेक्षित परिणाम होत नाही. त्यामुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात न राहता रुग्णांना हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोकचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे.पोलिस तपासात पंकज उपाध्याय याला ही बनावट औषधे विवेक राय याच्याकडून पुरवली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे. बनावट बिलांच्या आधारे संगनमताने हे रॅकेट चालवले जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# बाटलीत अडकलेल्या सापाची सर्पमित्राकडून सुटका

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रस्त्यावर फेकलेल्या रिकाम्या पाण्याच्या बाटलीत अडकलेल्या काळ्या चटयाबट्या सापाला सर्पमित्राने शिताफीने बाटलीतून सुटका करत त्या सापाला जीवनदान दिले आहे. ही घटना कल्याण पश्चिम भागातील वाडेघर परिसरातील रोनक सिटी मधील शंकर मंदिरासमोर घडली आहे. या सापाला सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी जीवनदान दिले.

विषारी बिन विषारी साप भक्ष्याच्या शोधात मानवी वस्तीत शिरत असल्याच्या घटना सातत्याने घडतच आहे. आजही मानवी वस्तीत साप शिरल्याची घटना घडली आहे. हवामानात बदल झाल्याने पहाटेची हुडहुडी थंडीतून गरम उब मिळावी म्हणून साप मोकळया जागेत उब घेण्यासाठी येत असतनाच,



कल्याण पश्चिम भागातील वाडेघर परिसरातील रोनक सिटी रोड वरील शंकर मंदिरासमोर काळ्या रंगाचे चटयाबत्याचा साप रिकाम्या बाटलीत अडकून पडल्याचे या परिसरातील नागरिक अभिजित कारभारी यांना दिसला. अभिजित कारभारी यांनी तातडीने सर्पमित्र दत्ता बोंबे यांना संपर्क करून या सापाची माहिती दिली. माहिती मिळताच काही वेळातच सर्पमित्र घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर ज्या बाटलीत हा साप अडकून पडला होता. त्या बाटलीचे निरक्षण करून त्या बाटलीत तंगुस बारीक धागा टाकून त्या सापाला शिताफीने कुठही इजा न होता बाहेर काढले. दरम्यान, बाटलीतून सापाला बाहेर काढल्यानंतर एका पिशवीत बंद केल्यान बघणाऱ्या नागरिकांनी सुटकेचा निश्वास घेतला. हा साप दिवड जातीचा असून बिन विषारी आहे. तर त्याचे आवडते खाद्य पाण्यातील मासे आणि लहान बेडूक इतर सापांच्या तुलनेत चपळ असतो. अशी माहिती सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी दिली आहे. या दिवड जातीच्या सापाला कल्याण वन विभागाच्या अधिकाऱ्याच्या परवानगीने निसर्गाच्या सानिध्यात आज सोडण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

## महापौर शर्मिला पिंपळोलकर व उपमहापौर कृष्णा पाटील यांच्या हस्ते

# ज्येष्ठ नागरिकांना डिजीटल पासचे वितरण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (18) :** ज्येष्ठ नागरिकांचा बसचा प्रवास सुलभ व सोपा व्हावा यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन विभागामार्फत 60 वर्षे पूर्ण व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना डिजीटल पास वितरीत करण्यात येणार आहे. या डिजीटल पासेसचा वितरण समारंभ आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या दालनात करण्यात आला. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात 11 ज्येष्ठ नागरिकांना महापौर शर्मिला पिंपळोलकर व उपमहापौर कृष्णा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. डिजीटल



पासेस लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महापौरांनी केले.

यावेळी उपायुक्त मनिष जोशी, परिवहन उपव्यवस्थापक सुनील जाधव, वाहतूक अधीक्षक रमेश बांदल, आगारव्यवस्थापक सुनील साठे, सहायक वाहतूक अधीक्षक हेमंतकुमार शिंदे, टीएमटी एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष गणेश देशमुख व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

राज्याचे उपमुख्यमंत्री व तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परिवहन सेवेतून प्रवास करणाऱ्या 60 वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना विनामूल्य प्रवास योजना सुरू केली. बसमधून प्रवास करताना वयाचा पुरावा असलेले शासकीय ओळखपत्र दाखवून झिरो तिकीटद्वारे ही योजना सुरू होती. त्याच धर्तीवर प्रशासनाने डिजीटल पास सुरू केले आहेत. या योजनेला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून 1 हजार ज्येष्ठ नागरिकांना या पासचे वितरण केले जाणार आहे. तसेच या योजनेसाठी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू असून टप्प्याटप्प्याने सर्वांना डिजीटल पास दिले जाणार आहेत. डिजीटल पास मिळेपर्यत जुन्या पध्दतीनेच झिरो तिकिट दिले जाणार असल्याचे परिवहन विभागाकडून सांगण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांचा प्रवास सुलभ होण्यासाठी ही योजना सुरू केली असून डिजीटल पासेस लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी यावेळी केले.

महापौर शर्मिला पिंपळोलकर व उपमहापौर कृष्णा पाटील यांच्या हस्ते रोहिणी सामंत, विनय सामंत, लक्ष्मण भोकसे, विजय पाटील, दयानंद कदम, जालींदर गवळी, कौशल्या वाघुले, अर्जुन वाघुले, सुनील गायकवाड, सीमा गायकवाड, कांतीलाल पाटील या ज्येष्ठ नागरिकांना प्रातिनिधीक स्वरुपात डिजीटल पासचे वितरण करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत महापौर, उपमहापौर व परिवहनसेवा व ठाणे महानगरपालिकेचे आभार मानले. डिजिटल प्रणालीमुळे प्रवास अधिक सोयीस्कर, पारदर्शक व सन्मानपूर्वक होणार असल्याच्या भावना ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केल्या.




# नवजीवन सहकारी पतपेढी कल्याण तर्फे नगरसेवकांचा सत्कार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** नुकत्याच झालेल्या कल्याण डोंबिवली महानगर पालिका निवडणुकीत निवडून आलेल्या (नवनिर्वाचित) नगरसेवकांचा नवजीवन सहकारी पतपेढी चे विद्यमान अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि संचालक मंडळाने सत्कार करून त्यांना प्रोत्साहित करण्याचा निर्णय घेतला .श्री वरूण सदाशिव पाटील, सौ विजयाताई पोटे, सौ. शालिनी सुनील वायले, सौ तनुजा वायले, श्री . जतीन प्रजापती , श्री .गणेश लांडगे , श्री . शामल मंगेश गायकर या विद्यमान नगरसेवकांचा आणि



माजी नगरसेवक श्री . अरविंद पोटे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला .नवजीवन सहकारी पतपेढीचे अध्यक्ष श्री विठ्ठल वाळुंज यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले . पाहुण्यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन झाले . पतपेढीचेउपाध्यक्ष आणि सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री . मधुकर पाटील यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख करून दिली .या देखण्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील सरांनी केले . श्री. वरूण पाटील नंतर सौ . विजयाताई पोटे आणि उपस्थित नगरसेवक यांची समयोचित भाषणे झाली. पतपेढीची वाटचालीसंदर्भात अध्यक्षीय भाषणात श्री. विठ्ठल वाळुंज यांनी "सदस्यां च्या आणि स्टाफच्या सहकार्याबद्दल आभार मानले . महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील शिक्षक तसेच पंचक्रोशीतील - खेडेगावातील आणि कल्याण मध्ये स्थायिक झालेल्या माननीय सदस्यांमुळे पतपेढीची उतरोत्तर प्रगती होत आहे . छोट्या छोट्या ठेवींमुळेही 'थेंबे थेंबे तळे साचे ' या न्यायाने पतपेढी चे रूपांतर बँकेत होऊ शकेल" असे मत मांडले. सदर कार्यक्रमासाठी बृहन्मुंबई मनपाचे माजी उपशिक्षणाधिकारी, प्रथितयश लेखक आणि ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ डॉ. आनंदराव सूर्यवंशी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. विद्यमान नगरसेवक यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अभिनंदन केले. डॉ . सूर्यवंशी म्हणाले, " कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या संबंधित विभागात तुमच्या कार्याचा सुगंध दरवळत राहो नि नगरसेवक म्हणून तुमच्या हातून सत्कार्य घडो . समुपदेशन ही काळाची गरज आहे . विद्यार्थ्यांवर सुसंस्कार झाले तर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊ शकेल . आपल्या विभागात विद्यार्थ्यांना शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शना साठी - उतम पीढी घडवण्यासाठी मला बोलवावे " असे विनंतीवजा आवाहन केले . आभाराने कार्यक्रमाची सांगता झाली.





# टेल्मा एएम बनावट औषध रॅकेटचा पर्दाफाश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण :** उच्च रक्तदाबावर वापरल्या जाणाऱ्या टेल्मा एएम या नामांकित औषधाच्या बनावट गोळयांची विक्री सुरू असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. मानपाडा पोलिसांनी मोठी कारवाई करत डोंबिवलीतील 'श्रीराम फार्मा'चा मालक पंकज उपाध्याय आणि मुंबईतील वितरक विवेक राय यांना अटक केली आहे. आरोपींकडून नामांकित कंपनीच्या लेबल्ससह बनावट औषधांचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासनाने दि. २० जानेवारी रोजी छापा टाकून रु. ८ लाख ९४ हजार ४०० किंमतीच्या २,७९५ स्ट्रिप जप्त केल्या. एफडीएच्या तपासात या गोळया शरीरात उशिरा विरघळत असल्याने रुग्णांना हृदयविकार व स्ट्रोकचा धोका असल्याचे समोर आले असून तपासात बिहार कनेक्शनही उघड झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास मानपाडा पोलीस करत आहेत.



## "माझी वसुंधरा अभियान ५.०" मध्ये ठाणे जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे :** पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वांच्या जतन व संवर्धनासाठी राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारे "माझी वसुंधरा अभियान" दिनांक २ ऑक्टोबर २०२० पासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सुरू करण्यात आले. या अभियानाचा पाचवा टप्पा म्हणजेच "माझी वसुंधरा अभियान ५.०" हा दिनांक १ जून २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत राज्यभर राबविण्यात आला.

ठाणे जिल्ह्याने या अभियानात उल्लेखनीय कामगिरी करत विभाग स्तरावर मानाचे स्थान पटकावले आहे. विभाग स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ठाणे जिल्ह्याला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. विभाग स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणारे गट विकास अधिकारी म्हणून पंचायत समिती मुरबाड, तसेच जिल्ह्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे गट विकास अधिकारी म्हणून पंचायत समिती भिवंडी यांची निवड करण्यात आली आहे. याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. या टप्प्यात राज्यातील ४२२ नागरी स्थानिक संस्था व २७,८९५ ग्रामपंचायती अशा एकूण २८,३१७ स्थानिक स्वराज्य संस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या अभियानांतर्गत पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, वृक्षारोपण, स्वच्छता उपक्रम, ऊर्जा बचत, कचरा व्यवस्थापन आदी विविध उपक्रम राबविण्यात आले. अभियानातील कामगिरीच्या आधारे शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व अधिकाऱ्यांना रोख पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

ग्रामपंचायत स्तरावर देखील ठाणे जिल्ह्याने विशेष यश संपादन केले आहे.

- १० हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या गटात काल्हेर ग्रामपंचायत – राज्यात प्रथम क्रमांक – रोख रक्कम बक्षीस १.७५ कोटी (एक कोटी पंच्याहत्तर लक्ष) तसेच भुमी थीमॅटिक मधील उच्चत्तम कामगिरी करिता रोख रक्कम ७५ लाख (पंच्याहत्तर लक्ष)
- १ हजारांपेक्षा कमी लोकसंख्या गटात सिंगापूर ग्रामपंचायत – राज्यात तृतीय क्रमांक – रोख रक्कम बक्षीस ५० लाख (पन्नास लाख)

तसेच विभाग स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ठाणे जिल्ह्याला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. हे यश जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, अधिकारी-कर्मचारी आणि नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

"माझी वसुंधरा अभियान" हे पर्यावरण रक्षणासाठीचे प्रभावी व्यासपीठ ठरले असून भविष्यातही अशाच प्रकारे पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प जिल्हा परिषद ठाणे प्रशासनाने व्यक्त केला आहे.

> "माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये ठाणे जिल्ह्याला मिळालेले यश हे केवळ पुरस्कारापुरते मर्यादित नसून पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने केलेल्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच नागरिकांनी पंचतत्त्वांच्या जतनासाठी घेतलेली जबाबदारी आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणी यामुळेच ठाणे जिल्ह्याने राज्य पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. जलसंधारण, वृक्षारोपण, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत आणि हरित उपक्रम यांसारख्या विविध उपक्रमांत स्थानिक स्वराज्य संस्थांनी दाखविलेली बांधिलकी कौतुकास्पद आहे.""हे यश पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. पर्यावरण संवर्धन ही एकदाच राबवायची मोहीम नसून ती सातत्याने जोपासायची जीवनशैली आहे. त्यामुळे आगामी 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या व संबंधित विभागांनी नव्या जोमाने पुढाकार घ्यावा, नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घ्यावेत आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवावा, असे आवाहन करतो. हरित, स्वच्छ व शाश्वत ठाणे घडविण्यासाठी प्रशासन व जनतेचा समन्वय हाच यशाचा खरा मंत्र ठरेल." **- उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे**

## शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मोहन्यात पार पडला रोजगार मेळावा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व लाईटहाउस कम्युनिटीज फाउंडेशन यांच्या सहकार्याने, आम्ही सेवेकरी सामाजिक संस्था व मोहोने अध्यक्ष नगरसेवक राहुल कोट यांच्या पुढाकाराने आंबिवली पूर्वेतील मोहोने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील नालंदा बौद्ध विहार परिसरात भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला.

या मेळाव्यात दहावी, बारावी, पदवीधर, आयटीआय, डिप्लोमा, अभियांत्रिकी पात्रता असलेल्या फ्रेशर व अनुभवी उमेदवारांनी सहभाग घेतला. मॅन्युफॅक्चरिंग, ऑफिस व बॅक ऑफिस, डेटा एन्ट्री, बीपीओ, कॉल सेंटर, सेल्स-मार्केटिंग, हॉस्पिटल-हेल्थकेअर, सिक्युरिटी, ड्रायव्हर, हेल्पर, आयटी व सोशल मार्केटिंग अशा विविध क्षेत्रांतील नोकऱ्या उपलब्ध होत्या.

एकूण २६ कंपन्यांचा सहभाग असून २१५ तरुणांनी



मुलाखती दिल्या. त्यापैकी १०२ उमेदवारांची दुसऱ्या फेरीसाठी निवड झाली, तर एका विद्यार्थ्याला स्पॉट ऑफर मिळाली. कोटक महिंद्रा बँक, एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस, सारशी अभियांत्रिकी प्रा. लि., रेड रोझ गारमेंट्स, पटेल रिटेल मार्ट्झ, युनिकेअर हेल्थ केअर आदी कंपन्या उपस्थित होत्या.

यावेळी माजी आमदार प्रकाश भोईर, नगरसेविका स्वप्नाली केणे, तेजश्री गायकवाड, मनविसे शहराध्यक्ष विनोद केणे, तसेच लाईटहाउस कम्युनिटीज फाउंडेशनचे क्लस्टर हेड निकेश पाटील व त्यांच्या टीमने मेळाव्याचे यशस्वी नियोजन केले.

## मुंबई महानगर प्रदेशात प्रोजेक्ट अमृतचे आयोजन

### जल संवर्धनाच्या दिशेने संत निरंकारी मिशनचा सशक्त उपक्रम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण :** संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचा भव्य शुभारंभ रविवार, 22 फेब्रुवारी रोजी सकाळी 8 वाजता सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेशात कुलाबा ते भाईंदर, दादर ते मुलुंड व मानखुर्द, ठाणे, नवी मुंबई, उरण, डोंबिवली, कल्याण, बदलापुर, भिवंडी तसेच वसई-विरार आणि पालघर परिसरातील एकंदर 67 ठिकाणी या प्रोजेक्ट अंतर्गत जलस्रोतांची स्वच्छता करण्यात येणार आहे.

संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले की, हा विशाल उपक्रम देशभरातील 1500 हून अधिक ठिकाणी एकाच वेळी आयोजित केला जाईल. या महामोहिमेचे हे अभूतपूर्व प्रमाण या मोहिमेला ऐतिहासिक स्वरूप देईल, ज्यामुळे जलसंधारण आणि स्वच्छतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचेल.

पाणी हे केवळ एक साधन नसून जीवनाचा आधार आणि ईश्वराची अमूल्य देणगी आहे त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे हि जागृती समाजामध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. संत निरंकारी मिशनने बाबा हरदेव सिंह जी यांच्या प्रेरणादायी शिकवणी आत्मसात करून सन 2023 मध्ये संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने 'प्रोजेक्ट अमृत'ची सुरुवात केली होती.

नद्या, तलाव, सरोवरे, विहिरी व झरे अशा नैसर्गिक जलस्रोतांच्या संरक्षणासाठी समर्पित या जनआंदोलनाने आपल्या पहिल्या तीन टप्प्यांत सेवा, समर्पण व सहभागाचे उत्कृष्ट उदाहरण निर्माण केले आहे. याच यशामुळे प्रेरित होऊन हा चौथा टप्पा अधिक व्यापक, संघटित व दूरदृष्टीपूर्ण स्वरूपात राबविला जात आहे, ज्यामुळे समाजातील प्रत्येक घटकात निसर्गाबद्दल जागरूकता व सहभागाची सशक्त भावना निर्माण होईल.

मधुर समूह गायन, जनजागृती चर्चासत्रे आणि सोशल मीडिया मोहिमेद्वारे जलजन्य आजार आणि स्वच्छतेचे महत्व अधोरेखित केले जाणार आहे.जेव्हा मन निर्मळ असते तेव्हाच निसर्ग स्वच्छ राहतो, आणि जेव्हा सेवेत समर्पण असते तेव्हा समाजाचे नवनिर्माण होते हे अभियान त्याच संकल्पनेला बळ देणारे आहे.

## सौ. कमलताई किसन कथोरे म्हसा महाविद्यालयात शिवजयंती उत्सव सोहळा संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती महाराष्ट्रात आणि जगभरात वसलेल्या मराठी लोकांकडून १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर झाला. हा दिवस महाराजांचे शौर्य, दूरदर्शी नेतृत्व आणि प्रशासकीय कौशल्याचे स्मरण करून साजरा केला जातो. शिवजयंती उत्सव हा केवळ एक सण नसून तो एका महान युगाचा आणि विचारांचा उत्सव आहे, जो तरुण पिढीला प्रेरणा देतो, याच अनुषंगाने बुधवार दि. १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० दरम्यान सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, म्हसा येथे इतिहास व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती उत्सव सोहळा, २०२६ या दिमाखदार अश्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते ज्यामध्ये वक्तृत्व, गायन, नृत्य व शिवराज्याभिषेक सोहळा नाटिका या कार्यक्रमांचा समावेश होता. यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. सुरुवातीला म्हसा महाविद्यालय - म्हसा गाव - म्हसा महाविद्यालय या दरम्यान रॅली काढण्यात आली. रॅली मध्ये सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांच्या



शुभहस्ते श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अपर्ण करून तसेच दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभाग कर्यक्रम अधिकारी प्रा. कन्या हरड मॅम तसेच इतिहास विभाग प्रमुख प्रा. काजल डोहळे मॅम यांनी कार्यकमाचे प्रास्ताविक सादर केले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शिवजयंती उत्सवाची माहिती दिली तसेच सखोल असं मार्गदर्शन केलं. यानंतर सरांच्या शुभहस्ते कला व क्रीडा विभागात विशेष प्राविण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. प्रा. काजल डोहळे मॅम, प्रा. पुनम भुसाळ मॅम, प्रा. मयूरी घागस मॅम, प्रा. संदीप भावार्थे सर आणि प्रा. दिनेश शेळके सर यांनी विशेष मेहनत घेऊन वक्तृत्व, गायन, नृत्य व शिवराज्याभिषेक नाटिका या कार्यक्रमाची विद्यार्थ्यांकडून उत्तम अशी तयारी करून घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय सोनार सर, प्रा. मयुरी घागस मॅम यांनी केलं तर आभारप्रदर्शन प्रा. कन्या हरड मॅम यांनी केलं. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. यावेळी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचेही सहकार्य लाभले, यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात शिवजयंती उत्सव सोहळा, २०२६ कार्यक्रम पार पडला. शेवटी राज्यगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**वाडा :** वाडा तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या ओगदा ग्रामपंचायतीच्या हद्दीत येणाऱ्या तिळमाळ येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत वाड्यातील दाता ग्रुप च्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ चे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वह्या, चित्रकलेच्या वह्या, पेन्सिल, खोडरबर, शॉर्पनर, पट्टी, रंगखडू,



स्केचपेन आदी साहित्य आणि खाऊ चे वाटप करण्यात आले. परळी पासून ९ किलोमीटर आणि मुख्य रस्त्यापासून ५ किलोमीटर जंगलाच्या ठिकाणी असलेल्या ह्या

**दाता ग्रुपचा स्तुत्य उपक्रम**

जिल्हा परिषदेच्या शाळेत अशा उपक्रमांची गरज असल्याने ह्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. दाता ग्रुप चे कल्पेश ठाणगे, राजू महाले ह्यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व पटवून दिले. प्रत्येक महिन्याला एक जिल्हा परिषद शाळा ह्याप्रमाणे हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्साह वाढत असून पालक व शाळा प्रशासनाकडून संस्थेच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. ह्यावेळी संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते सुमेध थोरात आणि गावातील पालक वर्ग उपस्थित होता.




## भिवंडी मनपातर्फे टीबीविषयक प्रशिक्षण कार्यशाळा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्या क्षयरोग विभागामार्फत दिनांक 16.02.2026 रोजी दुपारी 2.00 वाजता खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम Doctor For You (DFY) या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची अध्यक्षता वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर यांनी केली. तसेच शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बुशरा सय्यद, RCH अधिकारी डॉ. वर्षा बारोड, WHO कन्सल्टंट डॉ. ज्योती साळवे तसेच छाती तज्ञ डॉ. विक्रम जैन यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेमध्ये राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम (NTEP) अंतर्गत खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांची भूमिका व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच TB Notification, MDR-TB, कॉन्टॅक्ट ट्रेसिंग, निक्षय मित्र योजना आणि Presumptive TB Cases यांसंदर्भात चर्चा करून मार्गदर्शन करण्यात आले.

भिवंडी मनपा शहरातील IGM hospital चे छाती तज्ञ डॉ. मो. अली धुरु तसेच अनेक खाजगी वैद्यकीय व्यावसायिक या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच NTEP व DFY संस्थेचे सर्व सुपरवायझर व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## वाशी खारेपाटातील पाणीप्रश्न ऐरणीवर

### 'धोंड्या-धोंड्या पाणी दे'चा आक्रोश





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण :** पेण तालुक्यातील वाशी शिर्की खारेपाट भागात अनेक वर्षांपासून पिण्याच्या पाण्याची समस्या जटील होऊन बसली आहे.परिणामी प्रलंबित पिण्याच्या पाणी प्रश्नासाठी खारेपाटातील नागरिकांचा आज १८ फेब्रुवारीला पेण येथील महात्मा गांधी मंदिर ते प्रांत कार्यालय असे घोषणा देत धोंडबा आंदोलन करण्यात आले.

वाशी-शिर्की खारेपाटातील नागरिकांना गेल्या आठ वर्षांपासून तीन दिवसआड पाणीपुरवठा होतो. हेटवणे धरण उशाला असले तरी कोरड मात्र घशाला कायम स्वरूपी पडली आहे.या धरणाचे पाणी नवी मुंबईला २४ तास पुरवठा होत असताना येथील जनता मात्र या पाणीटंचाईचा सामना करत आहे. कोट्यवधी रुपये खर्च होऊनही पाणी योजना पूर्ण झाली नसल्याने आता नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला .खारेपाटातील महिला पुरुष या एकदिवसीय आंदोलनात सहभागी होऊन पाणी आमचे हक्काचे आणि ते आम्हाला मिळाले पाहीजे अशा घोषणाने प्रशासनाला जागे केले.

ग्रामीण पाणी पुरवठा व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेचे अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन या पाण्यासंदर्भातील आपली भूमिका स्पष्ट करून जनतेला सांगितले सन 2017 ते एप्रिल 2025 पर्यंत जो सिंचन कालवा हेटवण्याचा जो सोडला जातो तो ग्रामीण पाणीपुरवठा विभाग टंचाई काळामध्ये पाणी सोडत होते. शहापाडा धरणाची पाणीपातळी कमी झाले आहे त्यामुळे धरणातील गाळ लवकरच काढला जाईल असे सांगून सिडकोच्या टॉपिंग वरील अनधिकृत नळ कनेक्शन ज्यांनी घेतले आहेत त्यांची नळ कनेक्शन तोडण्याची प्रक्रिया देखील प्रांताधिकाऱ्यांच्या मदतीने पोलिसांच्या सहकार्याने लवकरच राबविण्यात येईल तसेच टंचाई निवारणासाठी वाढीव पाणीपुरवठा उपाययोजनावर भर देण्यात आला असून, हेटवणे धरणावर ४५ एचपीचा पंप व तरणखोप सिडको पाइप लाइनवरून ३०० मि.मी.चा व्हॉल्व्ह बसविण्यात येणार आहे. ही पर्यायी व्यवस्था करण्यावर भर देणार असल्याचे ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय पेण उप अभियंता शेफाली देशमुख यांनी सांगितले.शेवटी आपल्या मागण्यांचे निवेदन प्रांताधिकारी यांना आंदोलन कर्ते यांनी झाले.

## चुकीच्या इंजेक्शनचा आरोप; चिमुकलीचा मृत्यू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता /मुंबई :** श्वसनाचा त्रास होत असल्याने सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात दाखल तीन महिन्यांच्या चिमुकलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. चुकीचे इंजेक्शन दिल्यामुळे मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप पालकांनी केला असून या प्रकरणी गोवंडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेबाबत रुग्णालयानेही अंतर्गत चौकशी सुरू केल्याचे समजते. चेंबूरच्या खारदेव नगर परिसरात चिमुकली कुटुंबियांसोबत राहत होती.दोन आठवड्यांपूर्वी खारदेव नगर परिसरात राहणाऱ्या रवी कोल्हे यांच्या तीन महिन्यांच्या मुलीला अचानक खोकला, ताप आला. तसेच श्वास घ्यायला त्रास होत असल्याने कोल्हे दाम्पत्याने मुलीला शताब्दी रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी तिला सायन रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला. रुग्णालयातील उपचारांमुळे मुलीच्या प्रकृतीत सुधारणा झाली. मात्र डॉक्टरांनी दिलेल्या इंजेक्शननंतर अचानक मुलीची प्रकृती बिघडली आणि काही वेळातच तिचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबियांनी केला. याप्रकरणी संबंधित डॉकटरवर कारवाई करण्याची मागणी कुटुंबियांनी करत गोवंडी पोलीस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवत तपास सुरू केला.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024